# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यार्थी सहाय्यक योजना

**प्रस्तावना** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची स्थापना होऊन आजमितीस सुमारे ३१ वर्ष पूर्ण होत आहेत. या संपूर्ण कालावधीमध्ये विद्यापीठाचा फार मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा या जिल्ह्यांमध्ये स्थित असलेल्या विविध महाविद्यालयांची संख्या ४१५ एवढी झालेली आहे. या सर्व महाविद्यालयांमध्ये आजमितीस सुमारे ४.५० लक्ष विद्यार्थी प्रवेशित असून ६५१ परिक्षांचे आयोजन विद्यापीठाद्वारे प्रतिवर्षी सर्वांच्या सहकार्याने केले जाते. संलग्नित सर्व महाविद्यालयामध्ये तद्वतच विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रशासनासंबंधी बरेचदा विविध स्वरुपाच्या अडचणी येतात. अनेकदा त्यांना संपूर्ण विभागांची माहिती नसल्याने त्यांना शारीरिक व मानसिक त्रास तसेच वेळेचा अपव्यय होतो, ही बाबही निदर्शनास येते. अशा मनोवस्थेत विद्यार्थी हे विविध राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटनांच्या मदतीची अपेक्षा करतात व अशातच या विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांना प्रसंगी विद्यापीठातल्या संबंधित विभागांच्या अधिका-यांना भेटून आपली निवेदने सादर करावी लागतात. ज्यामुळे अनेकदा संस्थेच्या कार्यकुशलतेवर ताशेरे ओढले जाऊन विद्यापीठाला नाहक समाज रोषाला बळी पडावे लागते. या सर्व बाबींतून नेमका उद्देश्य बाजूला राहून विद्यापीठाला विविध अडचणींचा सामना करावा लागतो, ही वस्तुस्थिती आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती तात्काळ मिळावी, त्यांचे अडचणीवर तोडगा निघावा. विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा निपटारा व्हावा. बाहेरगावातील विद्यार्थ्यांना परिसरात अडचणी जाऊ नये, ही बाब मा. कुलगुरूंचे विचाराधीन होती. उपरोक्त सर्ब बाबी लक्षात घेऊन खालील समितीचे गठन करण्यात आले.

१. **समिती** - सदर समितीमध्ये खालील अधिका-यांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्रीकांत पाटील | संचालक, विद्यार्थी कल्याण |
| २. | डॉ. अविनाश असनारे | संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ |
| ३. | श्री. विलास नांदूरकर | जनसंपर्क अधिकारी |
| ४. | श्री. अनिरूद्ध ज़ोशी | सुरक्षा अधिकारी |

२. **समितीची कार्यकक्षा व कर्तव्ये –**

२.१ समिती/समितीतील सदस्य विद्यार्थ्यांच्या मौखिक, लेखी, दूरध्वनी अथवा ई मेलद्वारे विचारण्यात आलेल्या माहिती/अडचणीवर संबंधितांस आवश्यक माहिती त्यांचेकडे उपलब्ध असल्यास प्रदान करतील अन्यथा सदर अडचणी ज्या विभागाशी संबंधित असेल त्या अधिका-यांशी संबंधितांस संपर्क करण्यास सुचित करतील.

२.२ ज्या अडचणीवर/माहितीवर समिती / सदस्य तात्काळ तोडगा सुचवू शकत नसल्यास, त्याकरिता अडचणी ज्या विभागाशी निगडीत असेल त्या विभागांच्या अधिका-यांशी तातडीने संपर्क करून माहिती प्राप्त करून विद्यार्थ्यास उपलब्ध करून देतील.

२.३ समिती/ सदस्यांनी त्यांचेकडे विद्यापीठ कार्यप्रणाली संबंधी उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे संबंधित व्यक्तीने केलेल्या कृतीत व निष्पन्न होणा-या परिणामास समिती/ सदस्य जबाबदार राहणार नाही.

२.४ समिती/सदस्य विद्यापीठ कार्यप्रणाली संबंधी आवश्यक माहिती विविध विभागात प्रत्यक्ष भेटून अथवा अप्रत्यक्ष रित्या प्राप्त करून घेतील. समिती सदस्य संबंधित व्यक्तीला पुरवित असलेली माहिती ही समिती सदस्यांकडे संबंधित अधिका-यांचे मार्फत पुरविण्यात आलेल्या माहितीच्या आधारांवर अवलंबून राहील.

२.५ समिती सामान्यतः परीक्षा, निकाल, पुनर्परिक्षण, परिक्षा आवेदन पत्रे, विद्यार्थी कल्याण, ग्रंथालय, विविध विभाग, प्रवेश, स्पर्धा परीक्षा आदिंसंबंधी त्यांचेकडे उपलब्ध माहिती संबंधितांस देतील.

२.६ विद्यापीठ प्रशासनाशी संबंधित अडचणी गतीमान पद्धतीने होण्याकरिता ज्या विविध विद्यार्थी संघटना निवेदने अथवा तक्रार अर्ज सादर करण्याकरिता विद्यापीठ परिसरात येतील त्यांना त्यांचे प्रकरणाशी संबंधित माहिती/ तोडगा मिळण्याकरिता प्रथम समिती सदस्यांकडे निवेदन प्रत देण्यास सुचविले जाईल. समिती सदर निवेदनाचे वाचन करून संबंधित अधिका-यांशी चर्चा करून सदर विद्यार्थी संघटनेच्या पदाधिका-यांना सुचित करेल. सदर सुचनेवर त्यांचे समाधान न झाल्यास त्यांना संबंधित वरीष्ठ अधिका-यांची भेट घेण्यासंबंधी सुचविले जाईल.

२.७ समिती सदस्यांना नियमित सेवा देत असतांना विद्यार्थी हित लक्षात घेऊन सदर कार्य करावे हा समिती स्थापनेचा मूळ हेतु आहे.

३. **समिती संबंधी माहिती** - सर्व सामान्यांना सदर समितीच्या उद्दीष्टांची तद्वतच त्यामध्ये सेवा देणा-या अधिका-यांची संपूर्ण माहिती व्हावी याकरिता त्यांचे नाव व भ्रमणध्वनी विविध ठिकाणी प्लेक्सद्वारे लावली जाईल. तसेच सदर माहिती माध्यमांना आवश्यक प्रचार व प्रसाराकरिता आणि विद्यापीठाच्या वेबसाईटवर सहज दिसेल अशा ठिकाणी उपलब्ध करुन दिली जाईल.

४. **समितीचे कार्यालय** - समितीचे कार्यालय विद्यार्थी भवन, मुख्य प्रवेश द्वाराजवळ येथे राहील. कार्यालय प्रमुख म्हणून संचालक, विद्यार्थी कल्याण आपल्या सेवा उपलब्ध करून देतील. त्यांना आवश्यकता पडेल त्यावेळी समितीचे इतर सदस्यांस आवश्यकतेनुसार आमंत्रित करतील.

५. **समितीस इतर विभागांचे सहकार्य** - सर्व शैक्षणिक व प्रशासकिय, विभागप्रमुख यांना सदर समितीच्या गठनासंबंधी व त्याच्या स्थापनेमागील उद्दीष्टांसंबंधी माहिती होण्याचे दृष्टीने प्रशासन विभागाच्या वतीने मा. कुलगुरु व कुलसचिवांचे अनुमतीने कार्यालयीन सूचना निर्गमित केली जाईल ज्यामध्ये या समितीतील सदस्यांना परिपूर्ण सहकार्य करण्याचे तसेच त्यांचे विभागासंबंधी अद्यावत माहिती सदर समितीस वेळोवेळी उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले जाईल.

| | | |
|---|---|---|
| स्वा/-<br>कुलगुरु,<br>संगाबाअवि | स्वा/-<br>कुलसचिव<br>संगाबाअवि | स्वा/-<br>संचालक,<br>विद्यार्थी कल्याण |

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी सहाय्यक योजना

विद्यापीठ पदव्युत्तर अथवा पदवी अभ्यासक्रमासंबंधी आपणास प्रवेश, अभ्यासक्रम, परिक्षा, निकाल, पदवी प्रमाणपत्रे, निकालपत्र, प्रवजन प्रमाणपत्र, विविध पदव्युत्तर विभाग, अभ्यासक्रम, प्रवेश नियम, विद्यार्थी कल्याण योजना, क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धा, स्पर्धा परीक्षा केंद्र आदि संबंधी माहिती अडचणी त्वरीत निराकरण होण्याच्या दृष्टीने आपण खालील नमुद अधिकाऱ्याशी संपर्क साधावा

| अ.क्र. | नाव | पद | संपर्क क्र. |
|---|---|---|---|
| १ | डॉ. गणेश मालटे | संचालक, विद्यार्थी कल्याण | ९४२१४७११०८ |
| २ | डॉ. अविनाश असणारे | संचालक, शारिरीक शिक्षण व रंजन मंडळ | ९९२२९३०१६६ |
| ३ | डॉ. विलास नांदुरकर | जनसपंर्क अधिकारी | ९०११०७१०७६ |
| ४. | श्री. संजय येरंडे | सहा. कुलसचिव (परिक्षा नियंत्रक कार्या) | ९७६३६३४७४२ |

झेरॉक्सची सुविधा पंतसंस्थेच्या कार्यालयाजवळ उपलब्ध आहे.

| स्वा/- | स्वा/- | स्वा/- |
|---|---|---|
| कुलगुरु, | कुलसचिव, | संचालक (वि.क) |
| संगाबाअवि | संगाबाअवि | संगाबाअवि |

संचालक
विद्यार्थी कल्याण
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.